*पुन्हा एकदा गरिबी हटावचा नारा देवुन कॉग्रेस करतेय जनतेची फसवणुक –सुधीर मुनगंटीवार*

*पाटणबोरी येथील सभेत हंसराज अहीर यांना विजयी करण्याचे आवाहन*
==========================================================

25 ऑक्टोबर 1951 रोजी लोकसभेची पहिली निवडणुक झाली, ही निवडणुक 21 फेब्रुवारी 1952 ला संपली. त्याकाळात जी भाषणे कॉग्रेस नेत्यांनी दिली आज तिच भाषणे त्यांचे पणतुही देत आहेत. गरिबी हटावचा नारा पुन्हा एकदा राहुल गांधी यांनी दिला आहे. वर्षानुवर्षे खोटी आश्‍वासने देवुन यांनी देशातील व राज्यातील जनतेला प्रत्येक वर्षातील 365 दिवसही एप्रिल फुल बनविले आहे. पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांची विकासाची व लोककल्याणाची पाच वर्षे आणि कॉग्रेसची प्रदिर्घ काळाची सत्ता यांची तुलना केल्यास या देशाला नरेंद्रभाई मोदी यांच्याशिवाय पर्याय नसल्याचे स्पष्ट होते. नरेंद्रभाई मोदी या देशाचे पंतप्रधान व्हावे यासाठी चंद्रपूर-वर्णी-आर्णी लोकसभा मतदार संघात हंसराज अहीर यांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.
दि. 02 एप्रिल 2019 रोजी यवतमाळ जिल्हयातील पाटणबोरी येथे आयोजित जाहीर सभेत अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार बोलत होते, यावेळी मंचावर आ. राजु तोडसाम, शेतकरी नेते किशोर तिवारी, भाजपाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र डांगे, शिवसेनेचे गजानन बेजंकीवार, शंकर सामृतवार, जानुसेठ गिलाणी, अमोल ढोणे, गजानन सिंगेवार आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.
यावेळी बोलतांना अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार पुढे म्हणाले, देशात 52 वर्षे तर राज्यात 47 वर्षे कॉग्रेसची सत्ता होती. बेरोजगारी, पिक विमा, किमान वेतन अशा सर्व विषयांची कॉग्रेसला आज आठवण होत आहे. इतके वर्ष कॉग्रेस कुंभकर्णी झोपेत होती. मात्र गेल्या पाच वर्षात पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांच्या नेतृत्वात हा देशात प्रगतीचे व विकासाचे विविध टप्पे अनुभवत आहे. सर्वसामान्यांची सेवा करणारा पंतप्रधान त्यांच्या रूपाने देशाने अनुभवला आहे. देशाचे वैभव वाढविणारे अनेक निर्णय त्यांनी घेतले आहे. आज आपल्या देशाने अवकाशात सिध्दी निर्माण केली आहे. अवकाशात क्षेपणास्त्र पाठविण्याचे तंत्र विकसित करत अवकाश सुध्दा काबीज केले आहे. ही निवडणुक ग्रामपंचायत, जिल्हा परिषदेची नसुन देशाचे भविष्य ठरविणारी ऐतिहासिक निवडणुक आहे. जगाचा कप्तान होण्याची क्षमता असलेल्या भारतमातेचा गौरव करण्याची आहे. या निवडणुकीत पुन्हा एकदा नरेंद्रभाई मोदी देशाचे पंतप्रधान व्हावे यासाठी या मतदार संघात हंसराज अहीर यांना प्रचंड मताधिक्याचा कौल बहाल करत विजयी करण्याचे आवाहन सुधीर मुनगंटीवार यांनी केले.
यावेळी आ. राजु तोडसाम, शेतकरी नेते किशोर तिवारी आदींची भाषणे झालीत. जाहीर सभेला नागरिकांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

*वणी येथे महायुतीच्या पदाधिका-यांची बैठक*
==================================

2 एप्रिल रोजी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी यवतमाळ जिल्हयातील मारेगाव, माजरी येथेही जाहीर सभांना संबोधित केले. यवतमाळ जिल्हयातील वणी येथे भाजपा-शिवसेना-रिपाई (आ) महायुतीच्या पदाधिका-यांच्या बैठकीला त्यांनी संबोधित केले. ही निवडणुक देशाच्या भविष्याच्या दृष्टिने अतिशय महत्वाचे असल्याचे सांगत कॉग्रेसच्या उमेदवाराच्या दुष्प्रचाराला आपल्या विकासकामांच्या, लोककल्याणकारी निर्णयांच्या आधारावर उत्तर देण्याचे आवाहन अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी या बैठकीत पदाधिका-यांना केले.